
साधारणपणे १९६० च्या दशकातली ही गोष्ट आहे. १९६७-६८ सालची. एकीकडे *तीसरी मंजिल*मुळे आर.डी. बर्मन एका रात्रीत हिट संगीतकार ठरले. देव आनंदच्या *गाईड*लाही घवघवीत यश मिळालं होतं. तर दुसरीकडे *उपकार*मुळे कल्याणजी-आनंदजी ही जोडी यशाच्या शिखरावर होती. लक्ष्मीकांत-प्यारेलालही स्वतंत्रपणे संगीतकार म्हणून बऱ्यापैकी जम बसवू लागले होते.


एकदा दुपारच्या वेळी कल्याणजी-आनंदजींच्या म्युझिक रूममध्ये आर. भट्टाचार्यांच्या एका सामाजिक विषयावर आधारित चित्रपटाच्या गाण्यांवर चर्चा चालू होती. त्यावेळी घरातल्या महिला वर्गाला आकर्षित करण्याच्या हेतूने मुद्दाम सामाजिक चित्रपट बनवले जात असत. एक भारतीय स्त्री आपल्या पतीसाठी कोणत्या शब्दांत शुभेच्छा व्यक्त करेल असा चर्चेचा विषय होता. कल्याणजीभाई तर मेहफिलीत रमणारे. त्यामुळे त्यांच्या आसपास आनंद बक्षी, गुलशन बावरा, इंदिवर वगैरे मंडळी होती.

थट्टा-विनोद चाललेले असताना अचानक इंदिवर गंभीर झाले आणि त्यांच्या मुखातून शब्द बाहेर आले, 'गंगा मैया में जब तक पानी रहें, मेंरे सजना तेरी जिंदगानी रहे...' यावर आनंद बक्षी आणि गुलशन बावरा यांनी वाह व्वाची दाद दिली. आणि मग त्या ओळींवरच संपूर्ण गीत लिहिलं गेलं. कल्याणजी-आनंदजींनी उत्तर भारतीय लोकसंगीतावर आधारित चाल लावली. गंगेच्या खळखळत्या प्रवाहाप्रमाणे कोरस ठरलं, 'हैया ओ गंगामैया, हैया ओ गंगामैया...'तो चित्रपट होता राजश्री आणि जितेंद्र या जोडीचा *सुहाग रात*. चित्रपट किती यशस्वी ठरला त्या चर्चेत पडायचं नाही. मात्र हे गीत 'गंगा मैया में जब तक पानी रहें, मेंरे सजना तेरी जिंदगानी रहे...' लोकप्रिय ठरलं.

कोणतंही भारतीय महाकाव्य घ्या, मग ते रामायण असो नाहीतर महाभारत, शिवपुराण, चंडीपाठ किंवा श्रीमद् भागवत असो, प्रत्येकात पतितपावन गंगामैयाचा उल्लेख हमखास सापडणार. हजारो वर्षांपासून गंगेला महानदी म्हणून पुजलं जातं. लोकांचं जीवन सुखमय आणि समृद्ध करणारी गंगा त्यांच्या जीवनातला एक अविभाज्य हिस्सा बनली आहे. मग आमच्या चित्रपटांत तिला विसरून कसं चालेल? योगायोगाने १९ मे रोजी गंगा सप्तमी आहे. आणि ज्येष्ठ महिन्यात उत्तर भारतात गंगा दशेरा नावाचा उत्सव साजरा केला जातो. म्हणून यंदाची गीतांजली गंगामय करण्याचं ठरवलं. हिंदी चित्रपटगीतांचा सुवर्णकाळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १९५० ते १९७० या कालखंडात गंगाजलाचे बरेच तुषार चित्रपट गीतांवर उडाले होते. अशा काही गीतांचा आज आपण विचार करणार आहोत.



जिस देस में गंगा बहती हैमध्ये पद्मिनीसह राज कपूर: हम उस देस के वासी है...



*काबुलीवाला*च्या गंगा आये कहा से...गाण्याच्या लोकप्रियतेत बलराज साहनीचाही वाटा होता.

सुनील दत्त आणि बलराज साहनींसारखे फारच थोडे कलाकार ब्रॉडकास्टिंग (रेडियो) च्या जगातून इथे आले होते. त्यातही बलराज साहनी तर इंग्रजी साहित्य हा विषय घेऊन एम.ए. झालेले. बलराज साहनींचं अभिनेता म्हणून चांगलं नाव झाल्यावर बीबीसीवर दिलेल्या एका मुलाखतीत म्हटलं होतं, 'माझ्या कारकीर्दीतल्या एका गीताचा उल्लेख मला मुद्दाम करावासा वाटतो. हिमालयातून निघणारी आणि उत्तरेकडच्या मैदानांतून वाहणारी गंगा नदी अनेक रूपांत दिसते. तिच्या उगमाकडे छोट्या मुलीचा अवखळपणा तिच्या ठायी दिसतो. तर मध्येच कड्यांवरून कोसळताना ती एखाद्या मदोन्मत्त हत्तीसारखी बेभान वाटते. पण तीच गंगा जेव्हा जमिनीवर उतरते तेव्हा एखाद्या पोक्त बाईसारखी गंभीर बनते. आम्ही रवींद्रनाथ टागोरांच्या एका कथेवर आधारित चित्रपट बनवत होतो तेव्हाची गोष्ट. विमलदा आणि सलिलदा (विमल रॉय आणि सलिल चौधरी) हेमंतकुमारना गंगेच्या विविध रूपांची माहिती देत म्हणाले, 'हेमंत हे गीत होन्टिंग (संगीत रसिकांना सतत गुणगुणावंसं वाटेल असं) झालं पाहिजे. मला वाटतं, हेमंतकुमारच्या सुपरहिट गीतांत काबुलीवाल्याचं हे गंगागीत सगळ्यात वरच्या रांगेत ठेवावं लागेल.'

बलराज साहनी यांच्या बोलण्यात अजिबात अतिशयोक्ती नाही. *काबुलीवाला*च्या कथानकानुसार कोणत्याही खास प्रसंगासाठी हे गीत अनिवार्य नव्हतं. तरीही हेमंतकुमारच्या आवाजातलं ते गीत लोकांना गंगेच्या तिरावर अलगद नेऊन ठेवणारं ठरलं. तुम्ही कधी एकाग्र चित्ताने ते गाणं ऐकलं आहे? गं...गा आये कहां से? गं...गा जाये कहां रे? आणि मग लयीत पुढचं गीत येतं. या गाण्यात गंगेच्या अवखळ बालिश स्वभावाचं वर्णन आहे तसंच तिच्या रौद्र रूपाचंही चित्रण आहे. तिच्या प्रौढ आणि गंभीर स्वभावाचंही कवीने नेमकं वर्णन यात केलंय. मुखडा असा आहे, 'लहेराय पानी में जैसे धूपछांव रे...' यात गीतकार, संगीतकार आणि गायक तिघांनी जो गोडवा आणलाय त्याला तोड नाही. सलिल चौधरींनी डफ, डुग्गी, डमरू या लोकवाद्यांचा उपयोग करून गाण्याला लोकसंगीताचा छान बाज दिलाय. याचे गीतकार होते गुलजार.

मुळात या गीतात पाच पाच दिग्गजांचा हात होता. विमल रॉय, गुलजार, सलिल चौधरी, हेमंतकुमार आणि बलराज साहनी.

काबुलीवालाच्या गीताच्या जवळपासचं वाटणारं एक गीत (काबुलीवाला १९६१ मध्ये प्रदर्शित झाला) त्यानंतर काही काळाने आर. डी. बर्मननी ट्रॅजेडी क्वीन मीनाकुमारीसाठी दिलं होतं. प्रत्यक्षात अपत्यसुखाला आसुसलेल्या मीनाकुमारीच्या त्या चित्रपटाचं नाव होतं

चंदन का पलना (१९६७). यात मीनाकुमारीने मुलासाठी झुरणाऱ्या स्त्रीची भूमिका साकारली होती. तिच्यावर चित्रित करण्यात आलेल्या त्या गीताचे बोल होते 'पार लगा दे मोरी नैया, ओ गंगा मैया, ओ गंगा मैया...' लताने गंगा मैया असं काही गायलंय की ऐकणाऱ्याला काळजात हात घातल्यासारखं वाटावं.

चित्रपटांत गीतकारांनी दोन प्रेमिकांच्या मनातल्या भावना व्यक्त करण्यासाठीही गंगेचा छान उल्लेख केला आहे. विजय भट्टच्या *बैजू बावरा*चं उदाहरण घ्या. अनेक तासांच्या चर्चेनंतर गीतकार शकील बदायुनी आणि संगीतकार नौशाद यांचं ज्या मुखड्यावर एकमत झालं ते गीत आजही लोकप्रिय आहे. बोल आहेत, 'तू गंगा की मौज मैं जमना की धारा हो रहेगा मिलन, ये हमारा तुम्हारा रहेगा मिलन...'

तुम्हाला कदाचित खरं वाटणार नाही पण १९६४-६५च्या दरम्यान *संगम*साठी शीर्षक गीताचा विचार झाला तेव्हा पहिल्या ओळी खुद्द राज कपूरने रचून दिल्या होत्या असं संगीतकार जयकिशन यांनी कवी वेणीभाई पुरोहित यांना सांगितलं होतं. *संगम*चं शीर्षकगीत होतं,

'मेरे मन की गंगा, और तेरे मन की जमना का
बोल राधा बोल, संगम होगा के नही?...'


या दोन्ही गाण्यांचं वैशिष्ट्य असं की, दोन्ही गाणी कधीही भैरवी रागात आहेत. *बैजू बावरा*चं 'तू गंगा की मोज मैं जमना की धारा...' शांत रसात आहे तर *संगम*चं 'मेरे मन की गंगा...' उत्साहाने परिपूर्ण आहे. पण राज कपूर 'तू गंगा की मोज मैं जमुना की धारा...'मुळे प्रभावित झाला होता हे नक्की.

राज कपूरला गंगेचं आकर्षण होतं. म्हणूनच आचार्य विनोबा भावेंनी डाकूंच्या आत्मसमर्पणाचं आंदोलन सुरू केलं ते सूत्र पकडून राजने एक चित्रपट बनवला. कथानकानुसार चित्रपटाचं शीर्षक काय असावं याबद्दल चर्चा सुरू झाली आणि राजला *जिस देस में गंगा बहती है* हे शीर्षक एका क्षणात पसंत पडलं. एक देश म्हणून जगभरात भारताची खास ओळख देणाऱ्या या चित्रपटात त्याच आशयाने शीर्षकगीतही असावं असा राजचा आग्रह होता आणि 'होठों पे सच्चाई रहती है, और दिल में सफाई रहती है, हम उस देस के वासी है जिस देस में गंगा बहती है...' मध्ये त्याला हवा असलेला आशय शब्दशः सामावला होता. या चित्रपटाची सगळीच गाणी हिट होती. त्यातलंच आणखी एक गाणं होतं मेरा नाम राजू, घराना अनाम, बहती है गंगा जहां मेरा गाम...' म्हणत राजने या गाण्यातही गंगा आणलीच. नंतर पतितांचा उद्धार करणाऱ्या गंगेचा प्रवाह लोकांनी आपली पापं धुण्यांमुळे प्रदूषित केलाय हे पाहून राज कपूरने आणखी एक चित्रपट गंगेला समर्पित केला. त्याचं नाव होतं, *राम तेरी गंगा मैली*.

एका खाजगी कार्यक्रमात रवींद्र जैन यांनी राम तेरी गंगा मैली हो गई पापीयों के पाप धोते धोते... हे गाणं ऐकवलं. त्यावेळी हेच शीर्षक घेऊन बनवलेल्या आपल्या चित्रपटाच्या गीत-संगीताची जबाबदारी राज कपूरने त्यांच्यावर सोपवली.



*गंगा जमुना*मध्ये वैजयंती-दिलीप आणि *गंगा जमुना सरस्वती*मध्ये जया प्रदा-अमिताभ



गंगा हा शब्द असलेले अनेक चित्रपटही येऊन गेलेत. उदा. *गंगा जमना, गंगा की सौगंध, गंगाधाम, गंगा तेरा पानी अमृत, गंगा जमना सरस्वती, गंगा का वचन, गंगा मांग रही बलीदान, गंगा मेरी माँ*...वगैरे वगैरे. पण त्यात गंगेचा उल्लेख नावापुरताच होता. त्याचा कथेशी काही संबंध नव्हता. अर्थात यालाही अपवाद आहेत. गंगा की लहरें...खरोखर सामाजिक चित्रपट होता. त्याचं नावही अगोदर वेगळं होतं. परंतु चित्रगुप्तने बनवलेलं गाणं 'मचलती हुई हवा में छमछम हमारे संग संग चले गंगा की लहरें...जमाने से कहो अकेले नही हम, हमारे संग संग चले गंगा की लहरें...' इतकं छान जमलं की चित्रपटाचं शीर्षक बदलून हे शीर्षक गीत म्हणून पुढे आलं. नायक होता धर्मेंद्र. तो नाराज झाला. नावावरून हा एखादा धार्मिक चित्रपट वाटेल असं त्याचं म्हणणं होतं. त्याची नाराजी कोणी लक्षात घेतली नाही तो भाग वेगळा.

*गंगा तेरा पानी अमृत*चं शीर्षकगीतही असंच अर्थपूर्ण होतं. 'गंगा तेरा पानी अमृत, झर झर बहता जाये, युग युग से इस देश की धरती तुझ सै जीवन पाये...' साहिर लुधियानवीच्या शब्दांना रवीने संगीत दिलं होतं. महंमद रफीने आपल्या बुलंद आवाजात ते गायलं होतं. या चित्रपटाचं स्वरूप धार्मिक आणि सामाजिक असं होतं. कलाकारांचीही भाऊगर्दी होतीच. अशोककुमार, रहेमान, नवीन निश्चल, शत्रुघ्न सिन्हा, नाना पळशीकर, रमेश देव, प्राण, निरुपा रॉय, योगिता बाली, अचला सचदेव...अशी मोठी यादी तयार होईल. वीरेन्द्र सिन्हा दिग्दर्शित या चित्रपटाने चांगला व्यवसाय केला होता. आजही उत्तर भारतात एखाद्या धार्मिक सणानिमित्त हा चित्रपट लागतो तेव्हा लोकांची गर्दी खेचतो.

गंगेचा उल्लेख असलेली अशी बरीच गीतं आहेत. गीतकार गंगेला जिवंत प्रतीक मानतात हे या गाण्यावरून लक्षात येतं. 'अब कोई गुलशन ना उजडे, अब वतन आजाद है, रूह गंगा की हिमाला का बदन आजाद है...' मुझे जीने दोच्या या शीर्षकगीतात महंमद रफीचा आवाज असा काही लागलाय की थेट हृदयाला भिडावा.

काही ठिकाणी गंगेच्या नावाचा वापर करून गीतकारांनी आपल्या अकलेचे तारेही तोडले आहेत. शम्मी कपूर अभिनित *तुम से अच्छा कौन है*साठी गीतकाराने लिहिलंय, 'गंगा मेरी मां का नाम, बाप का नाम हिमाला...' प्रत्यक्षात गंगेचा उगम हिमालयाच्या कुशीतून होतो. या नात्याने गंगा हिमालयाची मुलगी आहे. इथे त्यांच्यात पती-पत्नीचं नातं जोडलंय. पण प्रेमात, युद्धात आणि चित्रपटांतही सगळं क्षम्य!

आपण आपल्या लेखाची सुरुवात दाम्पत्य जीवनाने केली होती. तेव्हा शेवटही अशाच एका अर्थपूर्ण दाम्पत्यजीवनावर आधारित गीताने करू या. १९७५मध्ये प्रदर्शित झालेल्या *अपने रंग हजार* चित्रपटाचं लक्ष्मीकांत-प्यारेलालच्या संगीतात सजलेलं हे गीत पहा किती सुंदर आणि अर्थपूर्ण आहे'गंगा में डूबा न जमना में डूबा, डूब गया रे मेरा मन सजना तेरी दो आखियनमें...'